# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**

phone no 02525-297032,Mo No 8669604078
Address-sp office Bidco Road,Palghar west
E-Mail- propalghar@gmail.com


## प्रेसनोट क्र.७२ दिनांक २७/०७/२०२१

## दुचाकी चोरणारा सराईत गुन्हेगार यास जेरबंद करण्यात जव्हार पोलीसांना यश एकुण ०७ मोटारसायकल जप्त

---

दिनांक २२.०७.२०२१ रोजी १४.०० वा.सुमारास पाचबत्ती नाका जव्हार येथे फिर्यादी नामे श्री. मोहसिन अहमद पठाण,रा. एसटी स्टॅण्ड राजमहल समोर जव्हार ता.जव्हार जि.पालघर यांनी उभी केलेली ॲक्टीव्हा स्कुटी एका अज्ञात चोरट्यांने चोरुन घेवुन गेल्याने जव्हार पोलीस स्टेशन ठाणे गुन्हा रजि नं ७०/२०२१ भा.द.वि.स कलम ३७९ प्रमाणे दिनांक २२.०७.२०२१ रोजी दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्हयाच्या अनुषंगाने श्री. प्रशांत परदेशी, उपविभागिय पोलीस अधिकारी जव्हार विभाग यांचे मार्गदर्शनाखाली पोनि/श्री.अप्पासाहेब लेंगरे, पोउपनि/सागर पाटील यांनी घटनास्थळी तात्काळ भेट दिली. त्यानंतर पोनि/ श्री.अप्पासाहेब लेंगरे यांनी पोलीस उपनिरीक्षक सागर पाटील,पोहवा/भगवान धोडमारे, पोना/संदिप दिघे, पोशि/मिलीदं काकड, पोशि/मोहंडकर यांचे तपास पथक तयार केले. त्या पोलीस पथकाने पाचबत्ती नाका जव्हार येथे जावुन सविस्तर माहीती घेवुन चोरटयाचा शोध सुरु केला असता, गुप्त बातमीदारामार्फत खात्रीलायक बातमी प्राप्त करुन जव्हार येथुन चोरीस गेलेली ॲक्टीव्हा स्कुटी चोर हा विक्रमगड येथे असल्याची माहीती मिळाल्याने विक्रमगड येथे जावुन पोलीस उपनिरीक्षक सागर पाटील यांचे पथकाने एक आरोपी वय २३ वर्षे यास दिनांक २३/०७/२०२१ रोजी अटक करण्यात आलेले आहे.

सदर आरोपीकडे गुन्ह्यांचे अनुषंगाने कसुन चौकशी केली असता त्याने गुन्ह्यांची कबुली दिली. त्यानंतर आरोपीस मा न्यायालयात हजर केले असता आरोपीस दिनांक २७.०६.२०२१ रोजी पर्यंत पोलीस कोठडी देण्यात आलेली आहे. पोलीस कोठडी दरम्यान आरोपीकडे विचारपुस केली असता त्याने वालीव पोलीस ठाणे हद्दीतीत ३ वाहने व डहाणु पोलीस ठाणे हद्दीतुन ३ वाहने जव्हार पोलीस ठाणे हद्दीतुन १ असे ५ ॲक्टीव्हा व २ ज्युपीटर स्कुटी वाहनांची चोरी केल्याची कबुली दिलेली आहे. सदर आरोपीत याचे ताब्यातुन आजपावेतो एकुण ७ वाहने हस्तगत करण्यात आली आहेत.

सदरची कार्यवाही ही श्री.दत्तात्रय शिंदे, पोलीस अधिक्षक पालघर, श्री. प्रकाश गायकवाड, अपर पोलीस अधीक्षक, पालघर, यांचे आदेशान्वये श्री. प्रशांत परदेशी, उपविभागीय पोलीस अधिकारी जव्हार विभाग, श्री.अप्पासाहेब लेंगरे, प्रभारी अधिकारी जव्हार पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सागर पाटील, पोहवा/भगवान धोंडमारे, पोना/संदिप दिघे, पोना/ज़यराम कुरकुटे, पोना/माडी, पोशि/मिलींद काकड, पोशि/चेतन मोहंडकर, पोशि/योगेश गावीत यांनी केली आहे.